# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:31.10.2025** **वार:शुक्रवार**

---

1. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम
2. देशात आतापर्यंत दहा हजार शेतकरी-उत्पादक संघटनांची स्थापना
3. जागतिक घडामोडींमध्ये धोरणात्मक अनिश्चितता आणि आर्थिक अस्थिरता वाढत असल्याची भारताकडून चिंता व्यक्त आणि
4. आयसीसी महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची विक्रमासह अंतिम फेरीत धडक

**<u>एकता दौड</u>**

देशाचे पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज दीडशेवी जयंती आहे. दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदा सरदार पटेल यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीचं औचित्य साधून देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी आज सकाळी दिल्लीत सरदार पटेल यांना पुष्पांजली वाहिली. गृहमंत्री अमित शहा यांनीही आज पथदर्शी नेत्याला आदरांजली वाहिली. गुजरातमध्ये केवडिया इथं स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार पटेल यांच्या स्मारकस्थळी प्रजासत्ताक दिन संचलनाच्या धर्तीवर एकता संचलनाचं आयोजन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार आहे. या संचलनात विविध राज्यांची पोलिस दलं, घोडदळ, उंटदळ, इत्यादी सहभागी असतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल पाटणा इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.....

**नौ सौ से ज्यादा कलाकार देशभर से आकर हमारे देश की सांस्कृतिक विरासत को देश और दुनिया के सामने रखेंगे और एक प्रकार से यह परेड साच अर्थ में भारत की एकता का परेड बनकर रहेगा। एक भारत श्रेष्ठ भारत के कांसेप्ट को जमीन पर उतारने का काम करेगा और सरदार साहब की डेढ़ सौवीं जयंती के बाद अब हर इकतीस अक्टूबर को छब्बीस जनवरी की तर्ज पर ही ये परेड नियमित रूप से मनाया जाएगा और हमेशा हमेशा के लिए देश के युवाओं को सरदार साहब के सिद्धांतों को और सरदार साहब के देश के लिए किए हुए कामों को जानकारी देने का ये माध्यम बनेगा।**

या संचलनात 'एकतेचा धागा' या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्राचा चित्ररथ सहभागी होणार आहे. या महोत्सवात येत्या 7 आणि 8 नोव्हेंबरला सांस्कृतिक कार्यक्रमातही महाराष्ट्राच्या लोकपरंपरा दाखवणारं 15 ते 20 कलाकारांचं सादरीकरण असेल. येत्या 1 नोव्हेंबर पासून 15 नोव्हेंबर पर्यंत भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनी म्हणजेच जनजातीय गौरव दिनापर्यंत भारत पर्व साजरं केलं जाईल, अशी माहिती शहा यांनी दिली.

दरम्यान भारत पर्वानिमित्त राज्यात होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये युवकांनी भाग घ्यावा असं आवाहन राज्य शासनानं केलं आहे. यात पदयात्रा, निबंध, वादविवाद स्पर्धा, चर्चासत्र, पथनाट्य अशा विविध आविष्कारातून सरदार पटेल यांच्या जीवनकार्याची ओळख करुन दिली जाईल आणि या लोहपुरुषाला अभिवादन केलं जाईल.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय आर्य शिखर परिषदेत सहभागी होतील. हा कार्यक्रम महर्षी दयानंद सरस्वती जी यांच्या 200 व्या जयंती आणि आर्य समाजाच्या समाजसेवेच्या 150 वर्षांच्या स्मरणार्थ आयोजित ज्ञान ज्योती महोत्सवाचा एक भाग आहे. पंतप्रधान यावेळी उपस्थितांना संबोधित देखील करतील.

**<u>यात्री सुविधा केंद्र</u>**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी देशभरातील 76 प्रमुख रेल्वे स्थानकांवर मोठ्या संख्येनं प्रवासी सामावून घेण्यासाठी आधुनिक यंत्रणा उभारण्याच्या योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेत महाराष्ट्रातील आठ प्रमुख रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस, लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर, पुणे, नाशिक रोड, नागपूर, मुंबई सेंट्रल आणि बांद्रा टर्मिनस या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी बसण्याच्या, तिकीट घेण्याच्या आणि प्रतीक्षेच्या अत्याधुनिक सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. त्यामुळे सणासुदीच्या काळातील प्रचंड गर्दीवर नियंत्रण मिळवणे सुलभ होईल. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील 'यात्री सुविधा केंद्रा'च्या धर्तीवर ही केंद्रे उभारली जाणार आहेत.

**<u>शिवराज सिंह चौहान -FPO-समागम</u>**

देशात आतापर्यंत दहा हजार शेतकरी-उत्पादक संघटना (FPO) स्थापन झाल्या आहेत आणि काही FPO ची उलाढाल 100 कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे अशी माहिती केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. दोन दिवसांच्या FPO समागम 2025 मध्ये ते काल नवी दिल्ली इथं बोलत होते. एक हजार एकशे FPO आता कोट्यधीश झाले असून 52 लाख शेतकरी त्यांचा लाभ घेत आहेत. या उपक्रमाद्वारे दोन कोटी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचं सरकारचं लक्ष्य आहे. अर्थव्यवस्थेला चालना आणि कृषी उत्पादनात विविधता आणण्यासाठी कृषी क्षेत्रात एकात्मिक शेती आणण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. असं चौहान म्हणाले. या परिषदेत देशभरातील 24 राज्यं आणि 140 जिल्ह्यांमधील 500 पेक्षा जास्त शेतकरी, शेतकरी उत्पादक संघटना, अंमलबजावणी संस्था आणि क्लस्टर-आधारित व्यवसाय संघटनांचा सहभाग होता.

**<u>सरन्यायाधीश</u>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत भारताचे 53 वे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती केल्याबद्दल, केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जून राम मेघवाल यांनी समाज माध्यमावरून त्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>भारत-जर्मनी</u>**

जागतिक घडामोडींमध्ये सध्या अनिश्चित काळ असून धोरणात्मक अनिश्चितता आणि आर्थिक अस्थिरता दोन्ही वाढत असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. जर्मन एकता दिनाच्या समारंभात बोलताना डॉक्टर जयशंकर यांनी सांगितलं की, जागतिक व्यवस्था स्थिर करण्यासाठी तसंच शांतता, प्रगती आणि समृद्धीला चालना देण्याकरिता भारत आणि जर्मनीची महत्त्वाची जबाबदारी आहे. परस्पर सहकार्य वाढवून आणि परस्पर लाभदायक कार्यक्रम पत्रिकेद्वारे हे सर्वोत्तम प्रकारे साध्य करता येईल. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर जर्मनीच्या स्पष्ट भूमिकेबद्दल डॉक्टर जयशंकर यांनी आभार मानले.

**<u>अमेरिका</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी लादलेल्या आयातशुल्काच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या सिनेट सदस्यांनी या निर्णयाला आव्हान देत सिनेटमध्ये ठराव मांडला आणि इतर देशांमधून येणाऱ्या आयातीवर व्यापक शुल्क लादण्याच्या त्यांच्या योजनेला रोखण्यासाठी ठराव मांडत मतदान केलं. हा ठराव 51-47 मतांनी मंजूर झाला, चार रिपब्लिकन सदस्यांनी या शुल्कवाढीविरोधात मतदान केलं. हा ठराव मांडणारे सिनेटर रॉन वायडेन यांनी ट्रंप त्यांच्या अधिकाराबाहेर जात असल्याचा आरोप केला आहे.

**<u>भारत-ऑस्ट्रेलिया</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलियानं देशांतर्गत, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या भविष्यातील आव्हानांवर चर्चा केली आणि दहशतवादविरोधी, कायदा अंमलबजावणी, न्यायिक सहकार्य आणि सागरी सुरक्षेतील सहकार्याच्या विस्तृत बाबींवर विचारांची देवाणघेवाण केली आहे. भारत-ऑस्ट्रेलिया दहशतवादविरोधी संयुक्त कार्यगटाची दोन दिवसांची बैठक कॅनबेरा इथं

सुरू झाली. त्यावेळी या मुद्यांवर चर्चा झाली. परराष्ट्र मंत्रालयातील संयुक्त सचिव डॉक्टर विनोद बहाडे आणि ऑस्ट्रेलियाच्या दहशतवादविरोधी राजदूत जेमा हगिन्स या बैठकीत सह-अध्यक्ष होते.

**शिक्षण-एआय**

इयत्ता तिसरीपासून सर्व शाळांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा अभ्यासक्रम सुरू केला जाईल असं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. शिक्षण मंत्रालयानं सांगितलं की हा उपक्रम जटिल आव्हानं सोडवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराच्या दिशेनं पहिलंच परंतु महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संगणकीय विचारसरणी शिक्षण, विचार आणि अध्यापनाच्या संकल्पनेला बळकटी देईल आणि हळूहळू सार्वजनिक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता या कल्पनेकडे विस्तारेल असा विश्वास मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

**क्रिकेट**

आयसीसी महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघानं सात वेळा विश्वविजेत्या राहिलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा उपांत्य फेरीत काल पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. ऐकूया याविषयीचा हा वृत्तांत...

**या स्पर्धेत अपराजित राहिलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा भारतानं पाच गडी राखत पराभव केला आणि हा सामना जिंकला. सामनावीर ठरलेली भारतीय फलंदाज जेमीमा रॉड्रिग्ज हीच्या 134 चेंडूतील नाबाद 127 आणि कर्णधार हरमनप्रित कौरच्या 88 चेंडूतील 89 धावा हे भारतीय डावाचं वैशिष्ट्य ठरलं. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियन संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत 338 धावांचा डोंगर उभा केला होता. विश्वचषक स्पर्धेची तिसऱ्यांदा अंतिम फेरी भारतानं गाठली असून येत्या रविवारी, 2 नोव्हेंबरला भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. मर्यादित षटकांच्या इतिहासात आजपर्यंत सर्वात जास्त धावांचा पाठलाग करण्याची कामगिरी भारतानं या सामन्यात केली आहे.**

**तेलंगण**

मोंथा चक्रिवादळ आणि त्यानंतर आलेल्या मुसळधार पावसामुळे तेलंगणमधील हनमकोंडा आणि वारंगल या जिल्ह्यांमध्ये पूरपरिस्थिती गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ए रवंथ रेड्डी आज दोनही जिल्ह्यांची हवाईपाहणी करणार आहेत. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती निवारण दलाच्या पथकांनी दोन हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे. पूरग्रस्त बीआर नगर सारख्या भागात ड्रोनच्या माध्यमातून अन्नसाहित्य पुरवण्यात येत आहे. रेड्डी यांनी वारंगलमधील पूरग्रस्त भागात मदत कार्य जलद करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना आणि मुख्य सचिव, पोलिस महासंचालकांना दिले आहेत.

**हवामान**

महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल. किनारपट्टीवर सोसाट्याचे वाहतील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.